# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

**टेबल क्रः- १२** **पेपर कात्रण** **दिनांक :- १६/०३/२०२४**

-----------------००००००------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

CS CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक १६/०३/२०२४ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना  २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (**Heading**) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | घरफोडी करुन चोरी करण्या-या तीन सराईत आरोपींना अटक | माणिकपूर | |
| २. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | लिंक पाठवून फसवणूक | नवघर | |
| ३. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | रखवालदाराचा मोबाईल चोरला | काशिमीरा | |
| ४. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | हेरॉईनसह दोघांना अटक | काशिमीरा | |
| ५. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | तरूणाला मारहाण झाल्याने गंभीर दुखापत | नायगाव | |
| ६. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | विरारमध्ये सुतारकाम करणा-याची हत्या | विरार | |
| ७. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. २ | भाईंदरमधुन दुचाकी चोरीला | भाईंदर | |
| ८. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. २ | भाईंदरमधुन रिक्षा चोरीला | नवघर | |
| ९. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. ३ | रखवालदाराने घातला पत्नीच्या डोक्यात वरवंटा | नयानगर | |
| १०. | १६.०३.२०२४ | लोकमत पु. पान क्र. ४ | वसईत साठ लाख रूपयांच्या सांबर शिंगांची तस्करी | पेल्हार | |
| ११. | १६.०३.२०२४ | पुण्यनगरी पु. पान क्र. १ | महापालिकेच्या प्रवेशद्धारावर स्टॉलधारकांचे दूध ओतून आंदोलन | मिरा भाईंदर | |
| १२. | १६.०३.२०२४ | पुढारी पु. पान क्र. ३ | उत्तन-विरार सी लिंकला मंत्रीमंडळाची मंजूरी | मि.भा.व.वि. | |
| १३. | १६.०३.२०२४ | लोकसत्ता पान क्र. १८ | मिरा रोडमध्ये एकाचा आत्महत्येचा प्रयत्न | नयानगर | |
| १४. | १६.०३.२०२४ | लोकसत्ता पान क्र. १८ | नायगावमध्ये ४८ जणांवर गुन्हा | नायगाव | |

CamScanner

लोकमत पू. पान क्र. १

# घरफोडी करून चोरी करणाऱ्या तीन सराईत आरोपींना अटक

## माणिकपूर पोलिसांची कारवाई : दागिने, रक्कम हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दिवसा घरफोडी करून चोरी करणाऱ्या तीन सराईत आरोपींना अटक करण्यात माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. तिन्ही आरोपींकडून पोलिसांनी लाखोंचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शुक्रवारी दिली आहे.

आनंदनगरच्या अंबा भवन येथे राहणाऱ्या कल्पना मोरे (६५) यांच्या घरी ७ मार्चला दुपारी लाखोंची चोरी झाली होती. चोरट्याने घराचा सेफ्टी दरवाजा तोडून घरात प्रवेश करत लोखंडी कपाटातील पेटीमध्ये असलेले १७६ ग्रॅम सोन्याचे दागिने, १०० ग्रॅम चांदीचे दागिने व ४ लाखाची रोख रक्कम अशी एकूण ११ लाख २४ हजारांच्या मुद्देमालाची चोरी केली होती. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी याप्रकरणी तपास केला.



आरोपींकडून हस्तगत केलेल्या मुद्देमालासह पोलिस अधिकारी-कर्मचारी.

- तांत्रिक विश्लेषण करून गुन्ह्यातील आरोपी हे गोरखपूर एक्स्प्रेसने जात असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. तेव्हा नाशिकच्या मध्य रेल्वे पोलिसांच्या मदतीने आरोपी राकेश कुमार ऊर्फ चक्की (३३), मोहम्मद सईद ऊर्फ शानू खान (३७) आणि लालकेसर ऊर्फ बच्चा राय (२७) यांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.

- आरोपींकडून ४ लाख ६७ हजार ५६८ रुपये किमतीचे १०१ ग्रॅम सोन्याचे दागिने व २ लाख ६९ हजार ८०० रुपयांची रोख व २ मोबाइल फोन असा एकूण ७ लाख ५२ हजार ३६८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली ६० हजार रुपये किमतीची दुचाकी हस्तगत केली आहे. आरोपींविरुद्ध अन्य पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत.

# लिंक पाठवून फसवणूक

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट येथील सोनम हाईट्समध्ये राहणारे प्रकाश मिश्रा (५९) यांना मोबाइलवर एका अनोळखी व्यक्तीने लिंक पाठवली. लिंकवर मिश्रा यांनी क्लिक करून त्यात त्यांनी स्वतःच्या क्रेडिट कार्डबाबत माहिती टाकली. त्यामुळे त्यांच्या क्रेडिट कार्डमधून ६६ हजार रुपये कापले गेल्याचा त्यांना मेसेज आला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी नवघर पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

# रखवालदाराचा मोबाइल चोरला



**मीरा रोड :** मीरा रोडच्या डेल्टा महाडा इमारत येथील रखवालदार प्रिन्स यादव (२३) याचा मोबाइल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी त्यांच्या फिर्यादीवरून काशीमीरा पोलिसांनी अनोळखी चोराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# हेरॉईनसह दोघांना अटक

**मीरा रोड :** काशिमीरा पोलिसांनी काशीगाव, डोंगरी येथे राहणाऱ्या विशाल चौहान (वय २१) व इब्राहिम इसाक शेख (२०) या दोघांना हेरॉईन या अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून साडेतीन लाख रुपये किमतीचे हेरॉईन हे अमली पदार्थ जप्त केले आहे.

CamScanner

लोकमत पृ. पान क्र. 1

# तरुणाला मारहाण झाल्याने गंभीर दुखापत

लोकमत न्यूज नेटवर्क



**नालासोपारा :** कांदिवलीच्या मजेठिया नगरमध्ये राहणाऱ्या अंकित शहा (३१) याला किनारा हॉटेलमध्ये मारहाण झाल्याने गंभीर दुखापत झाली आहे. नायगाव पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

तरुण मित्र व फॅमिलीसोबत जेवणासाठी हॉटेलमध्ये गेला होता. तेव्हा त्यांच्या शेजारच्या टेबलवरील राहुल अशोक पांडे हा हॉटेलमधील वेटरला दिलेली ऑर्डर लवकर येत नसल्याने वेटरला शिवीगाळ करत होता. अंकितने त्याच्याकडे पाहत असल्याचा मनात राग धरून शिवीगाळ करून त्याच्यासोबत असलेला अभिषेक सिंग याने अंकित जोशीची कॉलर पकडून ठेवत नवीन सिंगने त्याला जोरात चापट मारली. राहुल पांडे याने अंकित शहा याच्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ कोणत्या तरी जाड वस्तूने मारहाण करुन फ्रॅक्चर केले.

# विरारमध्ये सुतारकाम करणाऱ्याची हत्या

## कोपरी खदानीजवळ आढळला मृतदेह

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या नारंगी कोपरी कच्ची खदान रोडवर एका ४० वर्षीय इसमाची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली आहे. दीपक उमेश चव्हाण (४०) असे हत्या झालेल्याचे नाव असून तो मुंबईच्या मालाड परिसरात सुतार काम करत होता.

शुक्रवारी सकाळी त्याचा मृतदेह दगडाने ठेचलेल्या अवस्थेत खदान परिसरात स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती विरार पोलिसांना दिली.



### तीन पथकांकडून तपास

याप्रकरणी विरार पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांची तीन विविध पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना केले असल्याची माहिती विरारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार यांनी दिली आहे.

लोकमत पृ. पान क्र. 2



# भाईंदरमधून दुचाकी चोरीला

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मार्ग येथील व्रजविहार इमारतीत राहणारे संजय कांबळे यांनी त्यांची दुचाकी नारायणा शाळेच्या प्रवेशद्वारासमोर सार्वजनिक रस्त्यावर उभी केली होती. सदर दुचाकी सकाळी जाऊन पाहिले असता चोरीला गेल्याचे आढळले. गुरुवारी भाईंदर पोलिस ठाण्यात १५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे तपास करत आहेत.

# भाईंदरमधून रिक्षा चोरीला

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या रावल नगर भागातील नर्मदा सदनमध्ये रामसरेख मौर्या हे रिक्षाचालक राहतात. त्यांनी त्यांची रिक्षा नेहमीप्रमाणे रात्री रूपल बिल्डिंगजवळ उभी केली होती. गुरुवारी सकाळी पाहिले असता रिक्षा चोरीला गेली होती. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात रिक्षा चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पु.
पान क्र. ३

# रखवालदाराने घातला पत्नीच्या डोक्यात वरवंटा

## स्वत:ची नस कापली : भांडणातून प्रकार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मुंबईच्या वडाळा भागात राहणाऱ्या नेपाळी रखवालदाराने मीरारोडमध्ये येऊन पत्नीच्या डोक्यात वरवंटा मारून स्वतःदेखील मानेची नस कापून घेतल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे.

मुंबईच्या वडाळा भागातील दोस्ती संकुलात रखवालदार असलेला नीलेश सिंह (३९) हा त्याची पत्नी मीना (३५) हिच्यासह शुक्रवारी दुपारी १२ च्या सुमारास मीरा रोडच्या नयानगर भागातील स्नेहा सदनमध्ये रखवालदार असलेल्या त्याचा पुतण्या मुकेश सिंहकडे आला होता. इमारतीच्या आवारातील रखवालदारासाठीच्या खोलीत नीलेश व मीना हे होते; तर मुकेश हा बाजूला गेला होता. एकच्या सुमारास मुकेश याला त्याचा काका रक्ताने माखलेल्या अवस्थेत खोलीचे दार उघडून बाहेर पडताना दिसला. मुकेश याने खोलीत पाहिले असता त्याची काकी रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडली होती.




### दारूच्या व्यसनातून कृत्य; गुन्हा दाखल

मीना आणि नीलेश या दोघांना कांदिवलीच्या शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून, मीना हिची प्रकृती चिंताजनक आहे. नीलेश याला दारूचे व्यसन होते व त्यातूनच भांडण होऊन त्याने मीना हिच्या डोक्यात वरवंटा मारून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केला. नंतर स्वतः तेथील भाजी कापण्याच्या चाकूने मानेची नस कापून घेतली. त्याने मीना हिच्यावर चाकूनेसुद्धा वार केल्याची शक्यता पोलिस सूत्रांनी वर्तवली. नयानगर पोलिसांनी मुकेश याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला असून, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करत आहेत.

लोकमत पु.
पान क्र. ५

# वसईत साठ लाख रुपयांच्या सांबर शिंगांची तस्करी

## दोघांना ठोकल्या बेड्या : पेल्हार पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीत सांबर या वन्य प्राण्यांच्या शिंगांची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना पेल्हार पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून ६० लाख रुपये किमतीचे दोन सांबर शिंगे जप्त करण्यात आले आहेत.

नालासोपारा पूर्वेच्या ॲपल इंडस्ट्री येथे १२ मार्च रोजी दोन व्यक्ती वन्य प्राण्याच्या शिंगांची विक्री करण्याकरिता येणार असल्याची गुप्त माहिती गुन्हे प्रकटीकरण . पथकाचे पोलिस निरीक्षक सोपान पाटील यांना मिळाली होती. त्याची माहिती तातडीने वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना देण्यात आली.



सांबर या वन्य प्राण्यांच्या शिंगांची तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना पेल्हार पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे.

### सापळा रचून आरोपींना केले जेरबंद

वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार तातडीने सापळा रचून आरोपींना अटक करण्यात आली आहे. मोहम्मद इम्रान फरियादअली शाह (४२) अशोक विरजीभाई पटेल (५८) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून त्यांच्याकडून दोन शिंगे, गुन्ह्यात वापरलेली रिक्षा, मोबाइल असा ६० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांच्याकडून लेखी अभिप्राय घेण्यात आला असून त्यांनी सदरचे शिंग हे सांबर वन्य प्राण्याची असल्याचे उघड झाले. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात वन्यजीव (संरक्षण) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# महापालिकेच्या प्रवेशद्वारावर स्टॉलधारकांचे दूध ओतून आंदोलन

## बाहेरील राज्याच्या दूध संघाना प्राधान्य न देण्याची दूध स्टॉलधारकांची मागणी

**मीरारोड :** गेल्या दोन वर्षांपासून आरे डेअरी बंद असल्यामुळे शहरातील आरे स्टॉलधारक पर्यायी व्यवस्था म्हणून स्टॉलवर महाराष्ट्र शेतकरी संघाच्या माध्यमातून वारणा सहकारी दुध उत्पादक संघाचे वारणा दूध आणि दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवत आहेत. याला मीरा भाईंदर महापालिकेने मान्यता द्यावी तसेच कर्नाटक, हैद्राबाद अशा राज्या बाहेरील दुध संघांना प्राधान्य देण्यात येऊ नये अशी आरे स्टॉल धारक संघटनेची मागणी आहे. परंतु या मागणीकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे संघटनेने मीरा भाईंदर महापालिकेच्या मुख्यालयावर मोर्चा काढून प्रवेशद्वारावर दुध ओतून तीव्र आंदोलन केले आले.

मीरा भाईंदर आरे स्टॉलधारक संघटनेचे अध्यक्ष संजय सावंत यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून आरे डेअरी बंद असल्यामुळे नागरिकांना पर्यायी दुध उपलब्ध करून देण्यासाठी संघाच्यावतीने वारणा दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवले. दुध आणि दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता चांगली असल्याने ते जनतेच्या पसंतीस सुध्दा उतरले. वारणा सहकारी दुध उत्पादक संघ महाराष्ट्र शेतकरी संघाचा अंगीकृत व्यवसाय असल्याने मीरा



भाईंदर महापालिकेने मान्यता द्यावी यासाठी आरे स्टॉलधारक संघटना सातत्याने पाठपुरावा करत आहे. महापालिकेच्या महसूलात भर पडावी यासाठी रॉयल्टी तत्वावर पदार्थ विक्रीची तयारी सुध्दा दाखविली. तरी सुध्दा अमूल (गुजरात), नंदिनी (कर्नाटक), हेरिटेज (हैदराबाद) इत्यादिमहाराष्ट्रा बाहेरील दुध संघाची शिफारस पत्रे महापालिका ग्राह्य धरत आहे. अशा दूध संघांचे शिफारसपत्र ग्राह्य धरण्यात येऊ नये. तसेच महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या वारणा दुध संघाच्या शिफारशीला प्राधान्य द्यावे. दुध केंद्र परवाना धारक व्यतिरिक्त चर्मकार, दिव्यांग व इतर स्टॉलधारकांना त्यांच्या स्टॉलवर दुध विक्री करण्यासाठी मान्यता देऊ नये अशी मागणी असुनही त्याकडे दुर्लक्ष करत नवीन परवाने तसेच नूतनीकरण केले जात आहेत. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी संघटनेचे सल्लागार शाम म्हाप्रळकर आणि अध्यक्ष संजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली स्टॉलधारकांचा मोर्चा काढण्यात आला होता. महापालिका मुख्यालयावर पोलीसांनी अडविल्यावर आंदोलकांनी प्रवेशद्वारावर दुध ओतून आंदोलन केले. त्यानंतर एका शिष्टमंडळाने महापालिका अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांना निवेदन दिले.

पुढारी पृ. पान क्र. ३

# उत्तन-विरार सी लिंकला मंत्रिमंडळाची मान्यता

## रस्ते वाहतुकीसह रो-रो सेवेला जलद पर्याय उपलब्ध होणार

**भाईंदर : राजू काळे**

राज्य शासनाकडून प्रस्तावित असलेल्या मुंबईच्या अंधेरी येथील वर्सोवा ते विरार (बोळींज) दरम्यानच्या सी लिंकच्या पहिल्या टप्प्यातील उत्तन ते विरार दरम्यानच्या सुमारे ४३ किमी सी लिंकला १३ मार्च रोजी आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तत्पूर्वी त्याचे वृत्त दैनिक पुढारीने मिरा-भाईंदरचा प्रवास होणार सुसाट या मथळ्याखाली ७ मार्च रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते. ते खरे ठरले असले तरी मिरा-भाईंदरचा मुंबईखेरीज विरारकडील प्रवास सुसाट होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### प्रवासातील अंतर सुमारे दीड तासाने कमी होणार

बोळींज हे ठिकाण विरार रेल्वे स्थानकापासून सुमारे ५ किमी अंतरावर असल्याने या सी लिंक द्वारे प्रवास करणाऱ्यांना काही मिनिटांमध्ये दोन्ही शहरांमध्ये पोहोचता येणार आहे. हाच प्रवास रस्ते मार्गे केल्यास किमान २ तासांचा अवधी लागतो. तर या सी लिंकमुळे या प्रवासातील अंतर सुमारे दिड तासाने कमी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हा सी लिंक एमएमआरडीएकडून बांधण्यात येणार असून त्याचा व्यवहार्यता अहवाल काही दिवसांपूर्वीच एमएमआरडीएकडून तयार करण्यात आला होता. वर्सोवा-विरार दरम्यानच्या पहिल्या टप्प्यातील उत्तन-विरार सी लिंकचे अंतर ४३ किमी इतके असणार असून त्यासाठी २१ हजार कोटींच्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे मिरा-भाईंदरचा प्रवास वसई-विरारच्या दिशेने सुसाट होणार असला तरी पुढील टप्प्यातील वर्सोवा-उत्तन सी लिंकला मान्यता मिळाल्यास हा प्रवास मुंबईच्या दिशेने देखील सुसाट होणार आहे. त्याचा फायदा, चाकरमान्यांसह, रुग्णांना सर्वाधिक होणार आहे.

मिरा-भाईंदर येथून वसई-विरारकडे जाण्यासाठी रेल्वे लोकल व मुंबई-अहमदाबाद द्रुतगती महामार्गाचा पर्याय आहे. दरम्यान २० फेब्रुवारीपासून रो-रो सेवेचा अतिरिक्त पर्याय उपलब्ध झाला असला तरी हि सेवा वसई किल्ल्यापर्यंतच मर्यादित आहे. त्यामुळे वसईच्या शहरी भागासह विरारकडे जाण्यासाठी लोकल व रस्ते वाहतुकीचाच पर्याय पूरक ठरत आहे. रस्ते वाहतुकीमार्गे अनुक्रमे वसई, विरारकडे जायचे झाल्यास पश्चिम महामार्गाला मोठा वळसा घालून सुमारे ४० ते ५० किमी चे अंतर पार करावे लागते. त्यात इंधन, वेळ व पैशाचा मोठा अपव्यय होतो. त्यातच वाहतूक कोंडी उद्भवल्यास हेच अंतर कापण्यास आणखी विलंब लागतो. याखेरीज लोकलने प्रवास केल्यास सुमारे १५ ते ३० मिनिटांमध्ये अनुक्रमे वसई व विरारला पोहोचणे शक्य होते. मात्र कार्यालयीन वेळेत व कार्यालये बंद झाल्यानंतरचा लोकल प्रवास त्रासदायक ठरतो. त्यात रुग्ण, वृद्ध व लहान मुलांचा प्रवास अत्यंत जिकरीचा ठरत असल्याने गर्दीच्या वेळी रस्ते वाहतुकीद्वारेच अनेकजण प्रवास करीत असतात. या मार्गावरील प्रवास मुंबई प्रमाणेच सुसाट करण्यासाठी राज्य शासनाने वांद्रे-वरळी, वरळी-नरीमन पॉईंट व अटल सेतू या सी लिंकच्या धर्तीवर वर्सोवा-विरार दरम्यान सी लिंक प्रस्तावित केला होता. या प्रस्तावित सी लिंकला मिरा -भाईंदरसाठी उत्तनच्या महाराष्ट्र ज्युडिशियल अकॅडमी येथे कनेक्टिव्हिटी देण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. यामुळे भविष्यात मिरा-भाईंदरकरांचा मुंबई व विरारकडील प्रवास सुसाट होणार असल्याचे वृत्त दैनिक पुढारीने ७ मार्च रोजी प्रसिद्ध केले होते. ते खरे ठरले असून शासनाने १३ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत वर्सोवा-विरार दरम्यानच्या पहिल्या टप्प्यातील उत्तन-विरार सी लिंकला मान्यता दिली. यामुळे तूर्तास मिरा-भाईंदरचा विरारकडील प्रवास सुसाट होणार असून हा सी लिंक विरारच्या बोळींज येथे उतरविण्यात येणार आहे.

लोकसत्ता पान क्र. १४

# मिरा रोडमध्ये एकाचा आत्महत्येचा प्रयत्न

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मिरा रोड येथे एका व्यक्तीने पत्नीवर चाकूने प्राणघातक हल्ला करून स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद करण्यात आली आहे.

नया नगर भागात स्नेहा सदन इमारतीमध्ये मुकेश सिंग हा सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास त्याचे वडाळ्यातील काका निलेश सिंग व काकी विना सिंग हे घरी आले होते. यावेळी मुकेश कामानिमित्त घराबाहेर गेले असता निलेश व विना यांच्या वाद झाला. यात निलेश याने भाजी कापण्याच्या सुरीने थेट विणावर वार केले आणि त्यानंतर स्वतःचा गळा कापून जखमी केले. येऊन पती- पत्नीला उपचारासाठी बोरवली येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. निलेश हा सतत दारू पीत असल्यामुळे त्यांचे वाद होत असल्याची माहिती मुकेश यांनी पोलिसांना दिली. निलेश सिंगवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती नया नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली. सध्या दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## विरारमध्ये हत्या

विरार पूर्वेच्या नारंगी कोपरी परिसरातील खादणीजवळ शुक्रवारी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. दिपक चव्हाण (४०) असे त्याचे नाव असून तो मुंबईत राहणारा आहे. विरार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.दगडाने ठेचून त्याची हत्या करण्यात आली होती. विरार पोलिसांची तीन विविध पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना केल्या असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी दिली आहे.

# नायगावमध्ये ४८ जणांवर गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** नायगाव पूर्वेच्या भागातील जूचंद्र यासह विविध ठिकाणच्या चाळ परिसरात छुप्या मार्गाने वीजचोरी करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. यात सुमारे ११ लाख ७८ हजारांची वीज चोरी झाल्याचे उघड झाले असून याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात ४८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या जूचंद्र उपकेंद्रातून नायगाव पूर्वेच्या भागातील वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येत आहे. मात्र काहीजण मीटर मध्ये फेरफार करून, आकडे टाकून छुप्या मार्गाने वीज चोरी करतात याचा फटका महावितरणला बसत आहे. वीज चोरीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

नुकताच नायगाव पूर्वेच्या जूचंद्र उपकेंद्राच्या अंतर्गत विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या चाळीत वीज जोडणी तपासणी मोहीम घेण्यात आली होती. यात सोमेश्वर नगर , जूचंद्र परिसर इत्यादी ठिकाणी अनेक ठिकाणी बेकायदेशीर मार्गाने वीज जोडण्या घेऊन वीज चोरी केल्याचे निदर्शनास आले आहे. यात वीज चोरांनी सुमारे ११ लाख ७८ हजार ९६० रुपयांची वीज चोरी करण्यात आल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात सहायक अभियंता संतोष बोकेफोडे यांनी तक्रार दिली. त्या तक्रारीवरून औद्योगिक, व्यवसायिक, घरगुती अशा वीज चोरी करणाऱ्या ४८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner